मजकुर :—

दिनांक १२/०५/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " माहे मार्च २०२१ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च — २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | भायखळा पोलीस ठाणे, परिमंडळ—०३ | गु.र.क्र. ६२/२१ कलम ४५५, ३८०, ३४ भा.द.वि.सं. सह ३, ४, २५ भा.ह.का. |

—: ' बंद दरवाजा तोडून हत्याराचा धाक दाखवून चोरी ':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिनांक ०४/०३/२०२१ रोजी ११.३० वा. चे सुमारास दोन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून फिर्यादी श्रीमती जिनत नुरमोहमंद शेख, वय ४४ वर्षे, यांचे राहते घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा व लॅच तोडून, त्यांचे घरात प्रवेश करून चोरी करीत असताना, त्यांचे शेजारी राहणारी महिला शाबिरा अन्सारी, वय ५५ वर्षे हिने पाहीले असता तिचे तोंड दाबून तिस फिर्यादी यांचे घरात नेवून तिचे हात, पाय व तोंड बांधून तिचे डोक्यास बंदूक लावून व गळयाला चाकू लावून, धमकी देवून फिर्यादी यांची मालमत्ता जबदरस्तीने चोरून नेली. म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती जिनत नुरमोहमंद शेख, वय — ४४ वर्षे, |
| चोरीस गेला माल | :— | १) ६,००,०००/—एक सोन्याचा हार सेट,<br>२) ६,४०,०००/—एक सोन्याचा हार सेट<br>३) २,४०,०००/—तीन सोन्याच्या बांगडया, प्लेन, अ.व. प्रत्येकी २ तोळा ६ तोळे<br>४) ४,८०,०००/—दोन सोन्याचे कडे, प्रत्येकी ६ तोळा एकूण १२ तोळे<br>५) १,१०,०००/— दोन Movado esperanza & Sports edition कंपनीची वॉच,<br>६) ४,५०,०००/— एक Cartier Tank Francaise कंपनीची वॉच (डायमंड असलेला )<br>७) २५,०००/— एक Tissot कंपनीची वॉच ( गोल्डन रंगाची ब्रिस्लेट टाईप वॉच )<br>८) १५,०००/— रूपये, एक Swatch कंपनीची वॉच<br>९) रोख २०,०००/— ( भारतीय चलनाच्या ५००/रूपये दराच्या एकूण ४० नोट<br>**एकूण मालमत्ता :— २५,८०,०००/— रूपये** |
| हस्तगत माल | :— | १) १,१०,०००/— रूपये, Movado कंपनीचे गोल्डन रंगाचे एक लेडीज घडयाळ<br>२) ००/— रूपये, एक निळया रंगाची मुठ असलेले स्क्रू ड्रायव्हर<br>३) २०,०००/— सॅमसंग कंपनीचा ए ५१ मोबाईल<br>४) रोख रक्कम १,०००/— रू.<br>५) रू ५,०००/— एक काळया रंगाचे लोखंडी अग्नीशस्त्र (गावठी कटट्ा),<br>६) रू ६००/— एकुण तिन जिवंत काडतुसे,<br>७) रू १००/— एक चाकु,<br>८) रू १००/— पिवळया रंगाचा शर्ट |
| आरोपी अटक व दिनांक | :— | फैजल उर्फ फैसल झुफ्लिकार अन्सारी, वय २५ वर्षे,<br>दि. १४/०३/२०२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात दोन अनोळखी आरोपीतांनी दिवसा ढवळया घरफोडी करून, बळीत वयोवृध्द महीलेचे हात, पाय व तोंड बांधुन अग्नीशस्त्राचा व धारदार हत्याराचा धाक दाखवुन जबरी चोरी केली असल्याने नमुद गुन्हयातील आरोपीतांचा तात्काळ शोध घेवुन तपास करण्याबाबत वरिष्ठांनी आदेशित केल हेते. त्याअनुषंगाने आरोपीबाबत कुठलाही मागमुस, घागेदारे नसताना गुन्हयातील संशयित

आरोपीतांचा शोध घेण्यासाठी घटनास्थळ परिसरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासणी केली असता दोन संशयीत इसम फुटेजमध्ये दिसुन आले. त्यामुळे सदर संशयीतांचा माग काढण्यासाठी मुस्तफा बाजार, ग्लोरीया चर्च, खडा पारसी, साखळी स्ट्रिट, लक्की कंपाउंड, आग्रीपाडा रोडवरील सरकारी व खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासले असता सदर संशयीत आरोपी हे पायी चालत व जागोजागी टॅक्सी बदलत प्रथम रंगुनवाला कंपाउंड, नागपाडा येथे व त्यानंतर काळा चौकी पोलीस ठाणे हद्दीत, शिवदर्शन सोसायटीजवळ, परेल येथे गेल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने अधिक फुटेज तपासणी करून, प्राप्त अस्पष्ट टॅक्सी नंबरवरून आर.टी.ओ. कडुन मिळते—जुळते टॅक्सी नंबर प्राप्त करून, शेकडो टॅक्सींमधुन आरोपींनी प्रवासासाठी वापरलेली नेमकी टॅक्सी व त्याचे चालकाचा शोध घेतला.

गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने टॅक्सीचालकाकडे केलेल्या तपासामध्ये त्याने नमुद आरोपीतांना कुर्ला रेल्वे स्टेशन परिसरात सोडल्याची माहीती मिळाली. त्यामुळे सदर परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणी केली असता सदर परिसरात बस स्टॉप, रिक्षा स्टॅन्ड, फेरीवाले, दुकाने, व रेल्वे प्रवाशी यांची अतोनात गर्दी असल्याने व सदर संपुर्ण परिसर कव्हर करणारे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे उपलब्ध नसल्याने यातील संशयीत आरोपी हे कोणत्या दिशेला गेले? याबाबत माहीती मिळुन येत नव्हती. सदर मार्गावरील सर्व ठिकाणचे टॉवर सेल आयडी काढुन, त्याचा सी.डी.आर. मागवुन, विश्लेषण केले त्यामध्ये कोणतीही माहीती मिळुन आली नाही.

त्यानंतर सदर आरोपींच्या घटनास्थळी येण्याच्या मार्गाचा तपास करण्यासाठी मोदी कंपाउंड, बॅ. नाथ पै मार्ग, येथील तसेच रे रोड रेल्वे स्टेशन ते कुर्ला रेल्वे स्टेशन दरम्यानचे सर्व रेल्वे स्टेशनवरील सी.सी.टी.व्ही. फुटेजची बारकाईने तपसणी केली असता स्टेशनवरील गर्दीमधुन नेमके संशयीत आरोपी ओळखुन त्या आरोपींनी घटनास्थळी येण्यासाठी कुर्ला स्टेशन ते जी.टी.बी. रेल्वे स्टेशन असा एका ट्रेनमधुन व काही वेळाने जी.टी.बी. ते रे रोड रेल्वे स्टेशन असे दुसऱ्या ट्रेनने प्रवास केल्याचे समजुन आले. त्यामुळे नमुद मार्गावरील टॉवर सेल आय डी काढुन त्याचे सी.डी.आर. चे विश्लेषण केले असता उपयुक्त माहीती मिळुन आली नाही. सदर गुन्हयातील अनोळखी आरोपी हे कुर्ला येथे राहणारे असण्याची शक्यता वाटल्याने कुर्ला व आजुबाजुच्या परिरातील अशा प्रकारचे घरफोडी चोरी करणारे अभिलेखावरील व जेल रिलीज आरोपी तपासले तसेच कुर्ला रेल्वे स्टेशन परिसरात सलग ५ दिवस सापळा रचुन तपासामध्ये प्राप्त फुटेजमधील संशयीत आरोपीतांच्या वर्णनाशी मिळतेजुळते वर्णनाच्या इसमांचा शोध घेतला.

खडकपाडा पोलीस ठाणे, कल्याण, जि. ठाणे हद्दीत दिवसा घरफोडी चोरीचा गुन्हा केलेल्या संशयीत आरोपीतांचे फुटेज मिळविले असता त्यामध्ये दिसणारे दोन संशयीत आरोपी हे भायखळा पोलीस ठाणेच्या नमुद गुन्हयातील संशयीत आरोपीतांच्या वर्णनाशी मिळते—जुळते असल्याने खडकपाडा पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हयाच्या घटनास्थळावर जावुन, तेथील टॉवर सेल आयडी (डम डाटा) काढुन त्याचा सी.डी.आर. मागविला. उपरोक्त सर्व टॉवर सेल आयडी सी.डी.आर. (डम डाटा) चे विश्लेषणे केले असता त्यामध्ये प्रथम ४१ संशयीत मोबाईल क्रमांक प्राप्त झाले. त्यांचे सी.डी.आर. मागवुन अधिक तपास केला असता त्यामध्ये मोबाईल क्र. ७४१७५६०६४७ या क्रमांकाचा धारक हा उत्तरप्रदेश येथुन दि. ०३/०३/२०२१ रोजी मुंबई येथे आला असुन त्याने दि. ०४/०३/२०२१ रोजी सकाळच्या वेळी कुर्ला रेल्वे स्थानक परिसरातुन त्याचे मोबाईलवरून कॉल केले असुन, त्यानंतर सदर मोबाईल धारकाने त्याच्या मोबाईलवरून १५:०० वा. च्या सुमारास कॉल केल्याचे दिसुन आले. यावरून सदर मोबाईल धारकाने दरम्यानच्या कालावधीमध्ये त्याचा मोबाईल बंद केला असल्याचे निदर्शनास आले. तसेच सदर मोबाईल धारक दि. १२/०३/२०२१ रोजी शिवाला काला, ता. चांदपुर, जि. बिजनौर, राज्य उत्तरप्रदेश येथे गेला असल्याचे त्याचे लोकेशनवरून निदर्शनास आले. त्यामुळे सदर मोबाईल धारक हा नमुद गुन्हयातील आरोपींपैकी एक असल्याची खात्री झाल्याने मा. वरिष्ठांच्या परवानगीने तात्काळ पोउनि दत्तात्रय जाधव, पोउनि रूपेश पाटील, व दोन अंमलदार असे पथक नमुद पत्त्यावर गेले.

सदर शिवाला काला, ता. चांदपुर, जि. बिजनौर, गावामधील वस्तीतील बहुतांश लोक हे

चोरीसारखे गुन्हे करून उपजिवीका करणारे असुन (आंबिवली, कल्याण पश्चिम, जि. ठाणे यासारखी वस्ती) अशा ठिकाणी नमूद आरोपीताचा शोध घेणे जिकीरीचे होते. अशा परिस्थितीतही नमूदचे पोलीस पथकाने कौशल्याने तपास करून, अल्पावधीत गुप्त बातमीदार तयार करून, गुन्हयातील संशयीत मोबाईल धारक व प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील फोटोवरून सदर संशयीत आरोपीचे नाव फैजल उर्फ फैसल जुल्फीकार अन्सारी, वय २५ वर्षे, असे असल्याची खात्री करून, शिवाला कालां या गावामध्ये मंदीरवाली गल्ली या ठिकाणी दिनांक १४/०३/२०२१ रोजी सापळा रचला. सदर ठिकाणी यातील आरोपी दिसून येताच पोलीस पथक त्याचे जवळ जात असताना त्यास चाहुल लागल्याने तो तेथून पळुन जावु लागला. त्यावेळी सर्व पोलिस पथकाने अत्यंत शिताफीने त्याचा पाठलाग करून, झडप मारून, त्यास योग्य त्या बळाचा वापर करून पकडले. त्यावेळी तेथील रहिवाशी जमा होवून सदर आरोपीच्या अटकेस विरोध करू लागले. अशा परिस्थीतीतही नमूद पोलीस पथकाने अत्यंत सयंमाने व चिकाटीने जमावास गुन्हयाबाबत माहिती देवून ताब्यात घेतलेल्या इसमाकडे गुन्हयाचा तपास करणे आवश्यक असल्याबाबत समजावून सांगून सुयोग्यरित्या परिस्थिती हाताळून नमूद आरोपीतास ताब्यात घेवुन त्यास अटक केले.

पोलीस कोठडी दरम्यान सदर अटक आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता अटक आरोपी नामे फैजल उर्फ फैसल जुल्फीकार अन्सारी, वय २५ वर्षे, याने व त्याचा साथीदार अजहर उर्फ अज्जु सरफराज शेख याने यापुर्वी पुणे, नाशिक, अहमदाबाद व उत्तरप्रदेश येथे घरफोडी चोऱ्या केल्याचे सांगुन, त्यावेळी पोलीस कशा प्रकारे त्यांचे पर्यंत पोहोचले याबाबत त्यांना अंदाज आल्याने, पुन्हा केलेल्या गुन्हयांमध्ये पोलीस त्यांचेपर्यंत पोहोचु नयेत म्हणुन पोलीसांना चकवा देवुन तपासाची दिशाभुल करण्यासाठी वेगवेगळया ठिकाणाहुन वारंवार टॅक्सी बदलुन, पायी चालत, व रेल्वेने प्रवास केल्याचे तसेच त्यांचे मोबाईल गुन्हयाचे घटनास्थळी जाण्या अगोदरच जाणुन—बुजुन बंद ठेवल्याचे सांगितले.

नमुद आरोपीने त्याचा साथीदार नामे अजहर उर्फ अज्जु याच्या मदतीने दि. ०४/०३/२०२१ ते दि. १०/०३/२०२१ रोजीच्या दरम्यानच्या काळात १) भायखळा पोलीस ठाणे, २) काळा चौकी पोलीस ठाणे, ३) सायन पोलीस ठाणे, ४) खडकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर ५) मुरबाड पोलीस ठाणे, ठाणे ग्रामिण ६) मिरा रोड पोलीस ठाणे, मिरा भाईंदर हदद्दीत दिवसा घरफोडी चोऱ्या केल्याचे उघड झाले. सदर अटक आरोपीताकडुन गुन्हयातील मुददेमाल (अंशत:) हस्तगत करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत मुददेमाल हा त्याचा साथीदार अजहर उर्फ अज्जू याच्याकडे असल्याचे अटक आरोपीने सांगितले.

नमुद गुन्हयात मानवी कौशल्याचा अचुक वापर करून आधुनिक व पारंपारीक तपासाचा अवलंब करीत आरोपींबाबत कुठलाही मागमुस, घागेदारे नसताना गुन्हयातील अनोळखी पाहीजे आरोपींनी पोलीस त्यांचेपर्यंत पोहोचु नयेत म्हणुन योजलेल्या युक्त्यांवर मात करून, अल्पावधीत आरोपीचा शोध घेवुन बिजनौर, उत्तर प्रदेश येथुन प्रतिकुल परिस्थितीमध्ये आरोपीतास अटक करून नमुद गुन्हा उघडकीस आणून आरोपीकडुन गुन्हयात वापरलेले अग्नीशस्त्र (गावठी कटट्टा), जिवंत काडतुसे, चाकु व गुन्हयातील चोरून नेलेली मालमत्ता (अंशत:) हस्तगत केली आहे.

**भायखळा पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. अशोक खोत | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | प्रभाकर खरमाटे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | दत्तात्रय नामदेव जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | रूपेश भगवान पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्र.३८२३ | दशरथ सोनावणे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | पो.ना.क्र.०३६९४ | अविनाश चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ना.क्र. ०३९४९ | अरूण वाडीले | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र. ०५०३२३ | स्वरूपसिंग गावीत | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र.०७०४९४ | अशोक बोरसे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र. ०७१२९५ | जयवंत पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र. ०९०४१८ | दिगंबर साताळकर | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र. ०९३२२५ | राकेश जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र. ०९१८७२ | प्रविण तोडासे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ०९२६३८ | संजय पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ०९३७०५ | सचिन ठाकुर | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक १२/०५/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे मार्च —२०२१ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च — २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | बोरीवली पालीस. ठाणे, परिमंडळ — ११ | गु.र.क्र. गु.र.क्र. ४०६/१४ कलम ३०२, भादंवि |

—: घरगुती भांडनातून खुन :—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात मयत इसम किसन गोपाळ खारवी, वय ६५ वर्ष हे अटक आरोपी अतिष विष्णू पटेल, वय २८ वर्षे, याचे वडील असून, दिनांक १०/१०/१४ रोजी २३.४५ वा. च्या सुमारास बंद घरामध्ये किसन गोपाळ खारवी, हे अतिष विष्णु पटेल यांना राहती खोली नावावर करण्यास नकार देत असल्याने त्याच्या रागाने अतिष विष्णू पटेल, याने किसन गोपाळ खारवी, यांचा गळा आवळुन त्यांचे डोके जमीनीवरील फरशीवर ३ ते ४ वेळा आपटुन जखमी करून जिवे ठार मारले. म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. विनोद किसन खारवी, वय ३२ वर्ष, |
| बळीत/मयत | :— | किसन गोपाळ खारवी, वय ६५ वर्ष |
| आरोपी अटक व दिनांक | :— | अतिष विष्णू पटेल, वय २८ वर्षे,<br>अटक दिनांक ११/१०/२०१४ रोजी |
| निकाल दिनांक | :— | दिनांक १६/०३/२०२१ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | आरोपी अतिष विष्णू पटेल वय ३३ वर्षे, यांस जन्मठेप व २००००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ३ वर्षे सक्षम कारावासासची शिक्षा सुनावण्यांत आली. |

तपास कौशल्य :— . सदर गुन्हयाचा परिपुर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन मा. न्यायालयात दाषारोप सादर करण्यांत आले. तत्कालीन तपासी अधिकारी श्री. धरणेंद्र कांबळे तत्कालीन पोलीस निरीक्षक (सध्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेमणुक दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई), प्रथम तपास अधिकारी पोउनि. रमेश सोनावणे, (सद्या मयत), नरेंद्र सिताराम मोहिते, वय ४९ वर्ष (पोशि. ०६.१६९२) बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई समन्स वॉरंट कारकुन दिपक मुरलीधर गिते, पोहक्र. ३०९६२ (बोरीवली पो. ठाणे) यांनी यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीतांविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडण्यास मदत केली. मा. श्री. एस.यु. बघेले साो., सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ९, दिंडोशी, मुंबई यांनी आरोपी अतिष विष्णू पटेल, वय ३३ वर्षे, यांस जन्मठेप व २००००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ३ वर्षे सक्षम कारावासासची शिक्षा सुनावण्यांत आली.

# बोरीवली पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | सुधीर भागवत कालेकर, | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | अरविंद भिकाजी घाग, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | हंसराज रामचंद्र दळवी, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोहक्र. ३०९६२ | दिपक मुरलीधर गिते, | |
| ५ | म.पो.ह.क्र. ५५२ | श्रीमती.शीला महेंद्र बगाडे, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०६१२८२ | अनंत रामराव चित्ते, | प्रशस्तीपत्रक |